
- 8 FEB 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रवादी क्रीडा सेलतर्फे कुलगुरू डॉ. शिंदे यांचा सत्कार

## खेळाडूंना दैनंदिन भत्ता वाढवल्याबद्दल कुलगुरुंचे अभिनंदन : खेळाडूंना ग्रेस गुण देणार, कुलगुरु यांचे आश्वासन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील खेळाडूंना भत्ता वाढवून दिल्याबद्दल राष्ट्रवादी क्रीडा सेलच्या वतीने सत्कार करताना राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष आर. के पोवारे. सोबत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी. टी. गायकवाड, सुहास साळोखे, प्रताप उर्फ भैया माने, अनिल घाडगे, संजय कुऱ्हाडे, संजय पडवळे, रियाज कागदी आदी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील खेळाडूंना १६० रुपये भत्ता दिला जात होता. विद्यार्थ्यांच्या दैनंदिन खर्चासाठी ही रक्कम कमी पडत असल्याने, भत्ता वाढवून मिळावा अशी मागणी होत होती. या मागणीची दखल घेत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी खेळाडुंना दैनंदिन भत्ता ३५० रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस क्रीडा सेलच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष आर. के. पवार यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून कुलगुरू डॉ. शिंदे यांचे अभिनंदन करण्यात आले. याप्रसंगी अधिसभा सदस्य प्रताप उर्फ भैया माने उपस्थित होते.

प्रताप उर्फ भैया माने म्हणाले, शिवाजी विद्यापीठ अंतर्गत विविध खेळासाठी संघ झोनलसह विविध क्रीडा स्पर्धांसाठी जातात. या खेळाडूंना पोषक आहार, सरावासाठी लागणारा खर्च यासह अन्य गोष्टींसाठी विद्यापीठाने दिलेला भत्ता अभिनंदनीय आहे. तरीही विद्यापीठातील खेळाडूंना विमा योजना सुरू करावी, झोनल, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळणाऱ्या विद्यार्थ्यांना १५ ते २० ग्रेसगुण मिळावेत. शिवाजी विद्यापीठातील खेळाडूंना भत्ता वाढवून मिळावा यासाठी राष्ट्रवादी क्रिडा सेलने वारंवार विद्यापीठ प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. याची दखल घेवून कुलगुरूंनी खेळाडूंच्या भत्यात वाढ केल्याबद्दल राष्ट्रवादी क्रीडा सेलचे अध्यक्ष सुहास साळोखे यांनी आभार मानले. राष्ट्रवादी सेवा दलाचे संघटक सचिव अनिल घाटगे यांनी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या कार्याचा गौरव केला. तसेच कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादीच्या सर्व सदस्यांशी त्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे संजय कुऱ्हाडे, रियाज कागदी, संजय पडवळे, सुनिल काटकर, सुनिल जाधव, चंद्रकांत सुर्यवंशी, नागेश फरांडे, लहू शिंदे, ऋषिकेश पाटील, प्रा. मधुकर पाटील, उत्कर्ष बचाटे आदी उपस्थित होते.

### विमा योजना सुरू करणार


सर्व अधिकार मंडळाच्या सम्मतीने विद्यापीठ खेळाडूंचा भत्ता वाढवला आहे. हा प्रतिनिधीक स्वरूपात मी स्विकारला असला तरी खऱ्या आर्थाने अधिकार मंडळाचा सत्कार केला पाहिजे. भविष्यात खेळाडूंना विमा योजना व खेळाडूंना ग्रेस गुण देण्याचा मानस आहे.

-कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे
(शिवाजी विद्यापीठ)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 8 FEB 2019
तरुण भारत

# कमी खर्चिक ऊर्जा निर्मिती हेच आव्हान

## ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. शिवराम भोजे यांचे प्रतिपादन : वारणानगर येथे आंतरराष्ट्रीय परिषद




वारणानगर : संशोधकांच्या संग्रहित शोधनिबंधाच्या सीडीचे अनावरण करताना प्र- कुलगुरू डी. टी. शिर्के, डॉ. शिवराम भोजे, डॉ. प्रवीण ससर्षी. सोबत डॉ. वासंती रासम, प्राचार्य डॉ. सुरेखा शहापुरे, प्रा. मिलिंद चिखलकर, डॉ. पी. एम भोजे, डॉ. एस. एस. खोत.

प्रतिनिधी
वारणानगर

गोरगरिबांना परवडेल अशी कमी खर्चातील ऊर्जेची निर्मिती हीच संशोधनातील मोठी संधी आणि संशोधकांच्या पुढील आव्हान आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. शिवराम भोजे यांनी केले. वारणानगर (ता. पन्हाळा) येथे श्री वारणा विभाग शिक्षण मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयांमध्ये 'ऊर्जा, पर्यावरण आणि संशोधनातील नीतिमत्ता' विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते.

डॉ. भोजे म्हणाले, आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत ऊर्जेची निर्मिती करताना पर्यावरणाचे जतन करण्याची गरज आहे. ऊर्जेच्या माध्यमातून मनुष्य आणि प्राण्यांच्या गरजा भागत आहेत. त्यासाठी नैसर्गिक साधनांचा वापर करणे गरजेचे आहे. संशोधनाच्या विकासासाठी परिषदांची आवश्यकता आहे. ऊर्जा निर्मिती आणि पर्यावरण संरक्षण विषयावर सर्वच राष्ट्रांनी वेळीच नियोजन करण्याची गरज आहे, अन्यथा भविष्यात मानव जातीचे अस्तित्व संपेल अशी भीती त्यांनी व्यक्त केली. मान्यवरांचे स्वागत प्राचार्य डॉ. सुरेखा शहापुरे यांनी संदर्भ ग्रंथ आणि पुष्प देऊन केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. एम. जी. चिखलकर यांनी करून दिला.

प्र-कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले, ऊर्जेची निर्मिती आणि ऊर्जेची बचत या संदर्भात लोक जागृती आवश्यक आहे. कार्यक्रमास वारणा विभाग शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. विनय कोरे यांनी शुभेच्छा दिल्या. देश-विदेशातून २७० संशोधक प्राध्यापक अभ्यासक विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या शोधनिबंधाच्या सीडीचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. वारणा शिक्षण मंडळाच्या प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम यांनी मनोगत व्यक्त केले.

परिषदेस 'पर्यावरण' विषयावर सॅलिसबर्ग विद्यापीठ, अमेरिका येथील निमंत्रित प्रोफेसर डॉ. प्रवीण ससर्षी यांनी मार्गदर्शन केले. 'संशोधनातील नीतिमत्ता' विषयावर प्रोफेसर नागप्पा शहापूर (कर्नाटक विद्यापीठ) यांनी तर 'ऊर्जा' विषयावर शिवाजी विद्यापीठातील विज्ञान शाखेचे अधिष्ठाता प्रोफेसर पी. एस. पाटील यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. एस. एस. पाटील यावेळी उपस्थित होते. प्रा. एम. जी. चिकलकर, डॉ. बी एस. शिर्के, डॉ. यु. बी. चिकुर्डेकर, डॉ. एस. वाय. जाधव, एस. एन. गोलगिरे, डॉ. पी. एस. राऊत., डॉ. एस. एस. खोत, डॉ. व्ही. एस. पाटील, डॉ. आर. पी. कावणे आदींनी परिश्रम घेतले.

### पर्यावरण संवर्धनाची आवश्यकता

जागतिक तापमान आटोक्यात ठेवण्यासाठी सर्वच राष्ट्रांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. फ्रान्स सारख्या देशाने प्रदूषणावरती नियंत्रण मिळवले आहे. देशाचा विकास होण्यासाठी ऊर्जा उत्पादन आणि ऊर्जा संवर्धन करणे तसेच पर्यावरणाचे संवर्धन करण्याची आवश्यकता आहे. संशोधनामधील सातत्य व प्रामाणिक प्रयत्नच राष्ट्राला विकासाच्या मार्गावर घेऊन जातील, असे डॉ. भोजे यांनी सांगितले.

सकाळ

# आरक्षणाने महिला सक्षमीकरणाला गती

## वक्त्यांचा सूर ; शारदाबाई पवार अध्यासनतर्फे विद्यापीठात चर्चासत्र

कोल्हापूर, ता. ७ : स्थानिक स्वराज्य संस्थांत आरक्षण मिळाल्याने स्त्रियांच्या सक्षमीकरणाच्या प्रक्रियेला गती मिळाली आहे, असा सूर विविध वक्त्यांनी आज व्यक्त केला. शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई पवार अध्यासनातर्फे राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. डॉ. मीना गायकवाड यांच्या प्रयत्नातून साकारलेल्या 'स्थानिक स्वराज्य संस्थांतील स्त्रियांचे नेतृत्व' विषयावरील लघुपटाने चर्चासत्राचे उद्‌घाटन झाले.

जिल्हा परिषद अध्यक्षा शौमिका महाडिक म्हणाल्या, "स्त्रियांनी स्वत:मध्ये बदल करण्याचा निश्चय केला, तर त्या सक्षम होतील. स्त्रिया सक्षम असून, त्यांनी स्वत:मधील क्षमता ओळखण्याची आवश्यकता आहे."

विजया पाटील म्हणाल्या, "आरक्षणामुळे स्त्रियांना स्वत:च्या क्षमता सिद्ध करण्याची संधी मिळाली आहे; पण अजूनही स्त्रिया धर्म परंपरांच्या चौकटीतून बाहेर येत नाहीत." पहिल्या सत्रात डॉ. श्वेता प्रसाद यांनी उत्तर प्रदेशमधील स्त्रियांचे सक्षमीकरण, डॉ. शकुंतला शेट्टर यांनी कर्नाटक, डॉ. अलकनंदा श्रीगारे यांनी गोव्यातील स्त्रियांचे सक्षमीकरण याविषयी मांडणी केली.

दुसऱ्या सत्रात शोभा वेगास यांनी प्रिया संस्थेच्या माध्यमातून स्त्री नेतृत्वाचा विकास व अडथळे, अनंदिता मुजुमदार यांनी इक्विडायव्हर्सिटी संस्थेच्या माध्यमातून वाढणारा स्त्रियांचा राजकीय सहभाग विषयावर मार्गदर्शन केले. या वेळी डॉ. भारती पाटील उपस्थित होत्या. नेहा वाडेकर यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई पवार अध्यासनातर्फे आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष शौमिका महाडिक, विजया पाटील, डॉ. भारती पाटील, नेहा वाडेकर.**



सकाळ

# विद्यापीठात उद्या संशोधन परिषद



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातर्फे शनिवारी (ता. ९) एकदिवसीय राष्ट्रीय संशोधन परिषद होत आहे. 'रिसेन्ट ट्रेंडस् इन केमिस्ट्री अँड मटेरियल सायन्स' हा परिषदेचा विषय आहे. परिषदेस सकाळी दहा वाजता सुरवात होईल, अशी माहिती रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. जी. एस. गोसावी यांनी दिली आहे. विद्यार्थी, संशोधक, शास्त्रज्ञ तसेच रसायनशास्त्राशी निगडित व्यावसायिक आणि उद्योजकांना एकत्रित आणून संशोधनात्मक विचारविनिमय करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हा परिषदेचा मुख्य हेतू आहे. नॅनो सायन्स अँड मटेरियल्स केमिस्ट्री, ग्रीन केमिस्ट्री अँड ग्रीन नॅनोटेक्नॉलॉजी, वेस्ट मॅनेजमेंट अँड रिसायकलिंग, एनर्जी जनरेशन अँड स्टोरेज यांसह अनेक विषयांवर विचारमंथन होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

Kolhapur, Main
08/02/2019 Page No. 5

सकाळ

# चंदगडी भाषेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा

## सेट परीक्षेच्या अभ्यासक्रमात समावेश, राज्यपातळीवर केला जाणार अभ्यास

**सुनील कोंडुसकर** : सकाळ वृत्तसेवा

चंदगड, ता. ७ : विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) राज्य स्तरावरील सेट परीक्षेसाठीच्या अभ्यासक्रमात चंदगडी भाषेचा समावेश केला गेला आहे. दोन वर्षांपूर्वी या भाषेचा दहावीच्या अभ्यासक्रमात

**» काही सुखद...**

समावेश झाला. त्यानंतर राज्यस्तरीय सेट परीक्षेच्या अभ्यासक्रमासाठी निवड केल्याने या भाषेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

कोकणी आणि कर्नाटकी हेल काढून बोलली जाणारी ही भाषा अन्य भाषेपेक्षा वेगळी आहे. तिची स्वतःची काही वैशिष्ट्ये आहेत. सावंतवाडी, दोडामार्गच्या सीमेपासून ते बेळगावच्या सीमेपर्यंत आणि चंदगडला लागून असलेल्या आजरा व नेसरी परिसरातील गावांत ही भाषा बोलली जाते. राज्य परीक्षा महामंडळावर काम करताना डॉ. नंदकुमार मोरे यांनी दहावीच्या मराठीच्या पुस्तकात या बोली भाषेचा समावेश केला. त्यानंतर अलीकडेच देशपातळीवर झालेल्या भारतीय भाषांच्या लोकसर्वेक्षणात डॉ. मोरे यांनीच या भाषेवरील दीर्घ नोंद लिहिल्यानंतर तिचा शिक्षण क्षेत्रातील प्रवेश सुकर झाला. जागतिक दर्जाच्या 'ओरिअंट बॅक्सवन' प्रकाशन संस्थेने या भाषेचा इंग्रजी अनुवाद प्रकाशित केला असून जगभरातील विद्यापीठांमध्ये ती अभ्यासासाठी उपलब्ध झाली आहे. महाराष्ट्रातील बहुतांश विद्यापीठांनीही तिचा समावेश अभ्यासक्रमात केला आहे. राज्य शासनाने मराठी पाठ्यपुस्तक आणि लोककलांच्या संकलन प्रकल्पाच्या निमित्ताने ही बोली मराठीची अधिकृत बोली असल्याचे जाहीर केले आहे. दरम्यान, यूजीसी ही देशातील विद्यापीठीय शिक्षणावर नियंत्रण ठेवणारी सर्वोच्च संस्था आहे. त्यांच्याकडून प्राध्यापक पदासाठी वर्षातून दोन वेळा देश पातळीवर 'नेट' तर राज्य पातळीवर 'सेट' परीक्षा घेतली जाते. त्यासाठी या वर्षापासून नवीन अभ्यासक्रम लागू केला असून त्यात चंदगडी बोली भाषेचा समावेश करण्यात आल्याने तिचा मान वाढला आहे. चंदगडकरांसाठी ही अभिमानाची बाब आहे.

### चंदगडीला स्वतंत्र दर्जा..

अहिराणी, कोकणी, मालवणी, पावरा, मावची, तावडी, तडवी, भिलाऊ, झाडी, वऱ्हाडी, पाटी, भिल्ली, डांगी, दखनी यांप्रमाणेच चंदगडी हीसुद्धा स्वतंत्र बोली असल्याचे या सर्वेक्षणातून सिद्ध झाले असून या भाषेचा स्वतंत्र दर्जा मान्य झाला आहे.